# सत्राणे उड्डाणे मारुती आरती

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं ।

करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ।

कडाडिले ब्रह्मांड धाकें त्रिभुवनीं ।

सुरवर नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥१॥

जय देव जय देव जय श्री हनुमंता ।

तुमचेनि प्रसादें न भीं कृतांता ॥ जय० ॥धृ०॥

दुमदुमिले पाताळ उठिला प्रतिशब्द ।

थरथरला धरणीधर मानीला खेद ।

कडकडिले पर्वत उड्डगण उच्छेद ।

रामीं रामदासा शक्तीचा बोध ॥२॥

जय देव जय देव जय श्री हनुमंता ।

तुमचेनि प्रसादें न भीं कृतांता ॥ जय० ॥धृ०॥

www.hinduismfacts.org